# मिरा-भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदीरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे – ४०१ १०१
दूरध्वनी क्र. २८१८११८३, २८१९२८२८
सार्वजनिक बांधकाम विभाग

## // कार्यादेश //

जा.क्र. मनपा/साबां/कार्या/१६८/२०२१-२२ दिनांक :- २६/७/२०२१

प्रति,

मे. विवान इन्फ्राप्रोजेक्ट
शॉप नं.१०, रुपाली दर्शन,
नवघर गाव, भाईंदर (पुर्व)

विषय :- निविदा मंजूरी बाबत. (टेंडर आयडी क्र. **687383_1)**

संदर्भ :- १) दि. ०९/०३/२०२१ रोजीची आर्थिक व प्रशासकीय मंजूरी.
२) दि.१९/०५/२०२१ रोजीची निविदा.
३) मा. आयुक्त यांची दि.०५/०७/२०२१ ची मंजूरी.
४) जा.क्र.मनपा/साबां/२१२/२०२१-२२ दि.०६/०७/२०२१ चे पत्र.
५) सुरक्षा अनामत रक्कम रु.४७,९९७/- पावती क्र. २२७४६६ अति. सुरक्षा अनामत रक्कम रु.१७,८१६/- पावती क्र.२२७४६७ दि.१२/०७/२०२१
६) दि.१२/०७/२०२१ रोजीचा करारनामा.

दि.१५/०५/२०२१ रोजीच्या **दै. सागर, साप्ता. हिंद सागर** या वृत्तपत्रात व ई-टेंडरींग पद्धतीने प्रसिद्ध झालेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ओवळा माजिवडा मतदार संघातील मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. ११ मधील एस.एन. कॉलेज समोरील तलावाशेजारील जागेत खुली अभ्यासिका बांधणे. (आमदार निधी)**
(अंदाजित खर्च रु. १७,८१,६४१/-)

सदर कामी आपण सादर केलेली **१०.२००० % कमी दराने** निविदा खालील अटीशर्तीवर मंजूर करण्यात येत आहे. सदर कामाची मुदत ही **०२ महिने** असून **दि.२६/७/२०२१ ते दि.२५/९/२०२१** पर्यत राहील.

<u>अटीशर्ती :-</u>

१. सदरचे काम आदेश प्राप्त झाल्यापासून ३ दिवसाच्या आत संबंधित कनिष्ठ अभियंता/ उपअभियंता यांच्या नियंत्रण व देखरेखेखाली सदर काम सुरु करण्यात यावे. तथा कामाचा फलक लावण्यात यावा.
२. शासनाने निश्चीत केलेल्या धोरणानुसार वस्तु सेवा कर (GST) भरणा करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.
३. काम सुरु करण्यापूर्वी प्रत्यक्ष कामाच्या स्थळांचे फोटो घेण्यात येऊन सादर करावे. काम सुरु असताना तसेच पूर्ण झाल्यावर देखिल फोटो घेऊन सादर करण्यात यावे.
४. सदरचे काम त्रयस्थ लेखापरिक्षण कक्षेत असल्यास त्रयस्थ लेखापरीक्षणाचे अहवाल अद्ययावत ठेवण्यात यावे.
५. सदर कामाच्या त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षणासाठी **मे. शासकिय तंत्रनिकेतन ठाणे** यांची नेमणुक करण्यात येत असुन त्यांना कामामध्ये आवश्यक ती माहिती, कागदपत्रे देऊन कामाची गुणवत्ता राखण्यासाठी सहकार्य करावे

कार्यकारी अभियंता (साबां)

१. मा. कामगार आयुक्त, ठाणे.
२. मा. उपविमा संचालक, महाराष्ट्र राज्य, बांद्रे (पूर्व), मुंबई – ४०० ०५१.
३. संगणक विभाग
४. लेखा विभाग
५. मे. शासकिय तंत्रनिकेतन ठाणे

<u>प्रत कार्यवाहीसाठी</u>
<u>श्री.चेतन म्हात्रे - कनिष्ठ अभियंता</u>

1) सदर काम हे निविदा मधील अटीशर्ती, स्पेसिफिकेशन, मापदंडानुसार, शासन, महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी देण्यात आलेले आदेश व आवश्यक परवानग्या घेऊन विहीत कार्यपध्दत अवलंबुन व अभिलेखाचे जतन करून कंत्राटदाराकडून मुदतीत काम करून घेण्याची जबाबदारी व्यक्तीश: आपली राहील.
3) सदर कार्यादेशाची माहिती वॉर्ड मधील संबधित नगरसेवकांना तात्काळ कळविण्याची दक्षता घेण्यात यावी.
4) सदर काम सुरू करण्यापुर्वी कामाच्या ठिकाणाच्या लेव्हल व छायाचित्र घेऊन अभिलेखी जतन करण्यात यावे.
5) सदर काम त्रयस्थ लेखापरीक्षणाच्या कक्षेत असल्यास त्रयस्थ लेखापरीक्षण करून घेण्यात यावे. कामात वापरण्यात येणाऱ्या बांधकाम साहित्याची वेळोवेळी सक्षम यंत्रणेकडून समक्ष तपासणी करून अहवाल संचिकेत अद्ययावत ठेवण्यात यावे.

कार्यकारी अभियता (साबां)
मिरा-भाईदर महानगरपालिका